सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४१०/४३०/४६५/४५०
ई-मेल – desk10@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

जाहीर सूचना : मान्यता नसलेल्या विद्यापीठ /अनधिकृत संस्थाबाबत

क्रमांक: १०/एडीएम/अनधिकृतसंस्था/२०२१/ ३ ९१ दिनांक : 18 MAY 2021

**मान्यता नसलेल्या विद्यापीठ/अनधिकृत संस्थांमधील पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका (Diploma, UG Degree, PG Degree, PG Diploma) या व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश न घेणेबाबत.**

प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य अंतर्गत राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत, महाराष्ट्र राज्यातील अभियांत्रिकी/तंत्रशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरिंग टेक्नॉलॉजी, प्लॅनिंग, बी.व्होक या पदवी तसेच एमबीए/एमएमएस, एमसीए, एम.फार्मसी, एम.ई./एम.टेक., एम. आर्किटेक्चर, एम.एचएमसीटी, फार्म.डी., फार्म.डी. (PostBaccalaureate), प्लॅनिंग या पदव्युत्तर पदवी इत्यादी अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येणार आहेत. तसेच तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे मार्फत महाराष्ट्र राज्यातील अभियांत्रिकी व तंत्रज्ञान, औषधनिर्माणशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरिंग टेक्नॉलॉजी, डी.व्होक या पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येणार आहेत. या अभ्यासक्रमांना, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद / फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया / कौन्सिल ऑफ आर्किटेक्चर / विदयापीठ अनुदान आयोग / विद्यापीठे / महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ इत्यादी सक्षम प्राधिकरणांची व महाराष्ट्र शासनाची मान्यता असणे आवश्यक आहे. संचालनालयाच्या www.dtemaharashtra.gov.in या संकेतस्थळावर **वरील सक्षम प्राधिकरणांची मान्यता असलेल्या संस्था व सदर संस्थेत चालविल्या जाणाऱ्या अधिकृत अभ्यासक्रमांची यादी/ माहिती उपलब्ध आहे.**

येथे असे नमूद करण्यात येते की, महाराष्ट्र राज्य कृषि, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण या मधील अनधिकृत संस्था स्थापन करण्यास आणि अनधिकृत अभ्यास पाठयक्रम सुरु करण्यास मनाई करण्याकरिता व तत्संबंधित किंवा तदाअनुषंगिक बाबींकरिता तरतूद करण्यासाठी महाराष्ट्र राज्य कृषि, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था व अनधिकृत अभ्यास पाठयक्रम (प्रतिबंध) अधिनियम २०१३ (सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०) करण्यात आला आहे. त्यानुसार महाराष्ट्र राज्यात उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण या मधील अनधिकृत संस्था स्थापन करण्यास आणि अनधिकृत अभ्यास पाठयक्रम सुरु करण्यास मनाई करण्यात आली आहे. व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेशोच्छुक विद्यार्थी वर्ग व पालक यांना सूचित करण्यात येते की, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद/फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया/कौन्सिल ऑफ आर्किटेक्चर/विदयापीठ अनुदान आयोग/ / विद्यापीठे / महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ इत्यादी सक्षम प्राधिकरणांची व महाराष्ट्र शासन यांचेकडून मान्यता नसल्यास अशा विद्यापीठ /संस्थांमध्ये प्रवेश घेऊ नये.

सक्षम प्राधिकरणांची मान्यता नसलेल्या विद्यापीठ अथवा अनधिकृत संस्था प्रवेशोच्छुक विद्यार्थ्यांना खोटी आमिषे दाखवून अथवा संस्था मान्यताप्राप्त आहे असे भासवून प्रवेश घेण्यास प्रवृत्त करतात व नंतर विद्यार्थ्यांना त्यांची फसवणूक झाल्याचे निदर्शनास येते. अशा प्रकारच्या तक्रारी या संचालनालयाकडेही येत असतात. या पार्श्वभूमीवर सर्व **प्रवेशोच्छुक विद्यार्थी आणि त्यांचे पालक यांना सतर्क करण्यात येते की, कोणत्याही अनधिकृत संस्थेच्या अथवा विद्यापीठाच्या भूलथापांना बळी न पडता अभ्यासक्रमाची मान्यता तपासून घ्यावी तसेच वर नमूद केल्याप्रमाणे संचालनालयाच्या संकेतस्थळावर अथवा सक्षम प्राधिकरणांच्या संकेतस्थळावर संबंधित संस्थेचे नाव व अभ्यासक्रम असल्याची खात्री करावी व नंतरच प्रवेश घ्यावा.** उपरोक्त अभ्यासक्रमांसाठी महाराष्ट्रातील संस्था/ विद्यापीठाच्या मान्यतेबाबत या संचालनालयाशी अथवा संचालनालयाच्या विभागीय कार्यालयांशी संपर्क साधल्यास त्याबाबतची अधिक माहिती देण्यात येईल.

(डॉ. अभय वाघ)
संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई